Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near
Balchitrawani, Behind Agharkar Research
Institute, Bhamburda, Shivajinagar,
Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं. १७८, १७९,
बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च
इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर,
पुणे ४११ ००४.

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 | EPABX -25705000 Fax : 25665807 |
Email : secretary.stateboard@gmail.com

क्रमांक रा.मं./परीक्षा–५/८३६ 18436
पुणे ४११ ००४.
दिनांक– १७.०२.२०२३
20

प्रति,

विभागीय सचिव,
सर्व विभागीय मंडळे.

विषय– उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) फेब्रुवारी–मार्च २०२३ परीक्षेकरिता प्रविष्ठ होणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांस सवलती देणेबाबत

संदर्भ– शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१७/(११८/१७)/एस.डी.६, दि. १६ ऑक्टोबर, २०१८

उपरोक्त विषयाच्या संदर्भांकित शासन निर्णयास अनुसरून कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) फेब्रुवारी–मार्च २०२३ परीक्षेकरिता प्रविष्ठ होणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांस जादा वेळ सवलत तसेच लेखनिक मिळणेबाबत शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत विभागीय मंडळांना प्रस्ताव प्राप्त होत असतात. त्यानुसार सदर विद्यार्थ्यांना जादा वेळ सवलत/लेखनिक देणेबाबत कार्यवाही करण्यात येते.

तसेच शासन निर्णयानुसार दिव्यांग विद्यार्थ्यांना सवलती देणेबाबत निकष ठरवून देण्यात आलेले आहेत तथापि काही शाळा/कनिष्ठ महाविद्यालय शासन निर्णय तसेच राज्य मंडळ, पुणे यांनी ठरवून दिलेल्या निकषाव्यतिरिक्त कागदपत्रांची मागणी करतात, यामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांना नाहक त्रास सहन करावा लागतो. तसेच काही दिव्यांग विद्यार्थी सवलतीपासून वंचित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यामुळे उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) फेब्रुवारी–मार्च २०२३ परीक्षेकरिता प्रविष्ठ होणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना परीक्षेस प्रविष्ठ होताना कुठल्याही प्रकारचे अडथळे येणार नाहीत तसेच कोणताही दिव्यांग विद्यार्थी त्यांना मिळणाऱ्या सवलतीपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्याबाबत आपल्या स्तरावरून विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांच्या प्रमुखांना कळविण्यात यावे. व त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे ४

क्र.मुंविमं/उमाप/ 436
वाशी नवी मुंबई-४०० ७०३.
दिनांक- 20/02/2023

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
मुंबई विभागीय कार्यक्षेत्रातील
सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ट महाविद्यालये,
मुंबई /बृहन्मुंबई / ठाणे / पालघर /रायगड जिल्हे.

उपरोक्त पत्रानुसार मुख्याध्यापक / प्राचार्यांनी आपल्या स्तरावर नोंद घेऊन उचित कार्यवाही करावी.

(डॉ.सुभाष बोरसे)
विभागीय सचिव,
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी नवी मुंबई- ४०० ७०३

**प्रत योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-**
१ मा.शिक्षण उपसंचालक,मुंबई.
२ शिक्षणाधिकारी (माध्य.) मुंबई / ठाणे /रायगड .
३ शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई विभाग ( पश्चिम/दक्षिण/उत्तर ).
४प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय जव्हार/डहाणू/शहापूर/पेण/पालघर.
**प्रत माहितीस्तव :-** मा.सचिव, राज्यमंडळ,पुणे

Scanned with OKEN Scanner